# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

**१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१**

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७,ई-मेल आयडी- dydpune@gmail.com,वेब साईट- WWW.dydepune.com


**महत्त्वाचे** **जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी(१८-१९)/पुवि/२०१७/** 2990

दिनांक :- **22 MAR 2018**

**प्रति,**

**सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,**
**उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र**

विषय :- इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१८-१९ मधील कॉलेज नोंदणीबाबत

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची ऑनलाईन नोंदणी करण्याकरिता खालील मुद्दयानुसार शिक्षण उपसंचालक कार्यालयात श्री. एम डी आवारी यांचेकडे संपूर्ण फाईल सादर करावी.

१) प्रथम http://pune.11thadmission.net या प्रवेशाच्या संकेतस्थळावरील आपल्या महाविद्यालयाची माहिती कॉलेज प्रोफाईल मधील सन २०१७-१८ ची सर्व माहिती वाचून तपासावी.

२) किरकोळ बदल असल्यास – तसेच प्राचार्य , उपप्राचार्य, तंत्रसहाय्यक, इतर कर्मचारी यांच्या नावात मोबाईल क्रमांकामध्ये बदल असल्यास तसे पत्र फाईलमध्ये सादर करावे. व त्याप्रमाणे रजिस्ट्रेशन लिंक सुरु झाल्यावर कॉलेज स्तरावरुन सदरचे किरकोळ बदल करावेत.

३) महत्त्वाचे बदल :- सन २०१७-१८ च्या रजिस्ट्रेशन केलेल्या माहिती मध्ये जर नवीन तुकडी, शाखा व फी मध्ये बदल करावायाचा असल्यास असा स्वतंत्र प्रस्ताव शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करावा.व त्यांची मान्यता मिळाल्यानंतरच सदर बदल मुख्य केंद्रावर येऊन प्रत्यक्षपणे विहित मुदतीत करावा.

४) नवीन मान्यता मिळालेले उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय--- **सन २०१७-१८ मध्ये नोंदणी नसलेल्या व** नव्याने मान्यता मिळालेल्या अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी आवश्यक **त्या सर्व कागदपत्रासह मुख्य केंद्रावर** विहित मुदतीत प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदणी करणे अनिवार्य आहे.

| **अ.क्र** | **झोन क्रमांक** | **झोन चे नांव** | **दिनांक** | **वेळ** | **फाईल जमा करण्याचे ठिकाण** |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | पुणे शहर विभाग | २३.०३.१८ | सकाळी १०.०० ते ५.०० | **शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे कार्यालय** |
| २ | २ | कर्वेनगर/कोथरुड विभाग | | | |
| ३ | ३ | पर्वती/धनकवडी/स्वारगेट विभाग | | | |
| ४ | ४ | सिंहगड रोड विभाग | | | |
| ५ | ५ | कॅम्प/येरवडा विभाग | | | |
| ६ | ६ | हडपसर विभाग | २३.०३.१८ | सकाळी १०.०० ते ५.०० | **शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे कार्यालय** |
| ७ | ७ | शिवाजीनगर/औंध/पाषण विभाग | | | |
| ८ | ८ | पिंपरी-भोसरी विभाग | | | |
| ९ | ९ | चिंचवड-निगडी विभाग | | | |

**सही/-**
**(मिनाक्षी राऊत)**
**सचिव**
**इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती**
**तथा**
**सहा.शिक्षण संचालक**
**पुणे विभाग पुणे-१**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे-१.

२) मा. **शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे-१.**




Scanned by CamScanner